# आव्हानावर मात करण्याची पावनखिंड मोहिमेतून प्रेरणा : डॉ. देवानंद शिंदे



**पन्हाळा : बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुतळ्यास अभिवादनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. टी. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील आदी.**

**सरुड, ता. २३ :** 'शिव पावन प्रेरणा मोहीम इतिहासात घेऊन जाते व किती जगला, कसे जगला आणि कसे जगावे याची, त्याचबरोबर खडतर आव्हानावर कशी मात करावी याची अनुभूती देते. म्हणूनच एकतरी मोहीम अनुभवावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व देशभक्त आनंदराव नाईक कॉलेज चिखली (ता शिराळा) यांच्या संयुक्त विद्यमाने पन्हाळा ते पावनखिंड या दोनदिवसीय शिव पावन प्रेरणा मोहिमेच्या सांगता समारंभ वेळी पावनखिंड येथे ते बोलत होते. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील यांनी केले. डॉ. शिंदे म्हणाले,''पुस्तकामधील इतिहास शिकणे,वाचणे आणि प्रत्यक्षातला इतिहास अनुभवणे काय असते याची प्रचिती येईल.जेव्हा आपण या मोहिमेचा आनंद घ्याल तेव्हा तुमच्यामध्ये देशभक्ती राष्ट्रभक्ती यांचे स्फुलिंग पेटल्याशिवाय राहणार नाही.'' मोहिमेत स्वतः कुलगुरू डॉ.शिंदे व त्यांचे कुटुंबीय, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, पी. टी. गायकवाड व कोल्हापूर, सांगली, सातारा येथील मिळून सुमारे १६४ विद्यार्थी, अधिकारी कर्मचारी या मोहिमेमध्ये सहभागी होते. सुत्रसंचालन पी. आर. माळी तर आभार डी. के. गायकवाड यांनी मानले. कुलगुरू डॉ. शिंदे यांचा इंग्रजी माध्यमाच्या चौथीमध्ये शिकणारा नातू अर्णव याने छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा सादर करून उपस्थितांच्या अंगावर शहारे आणत मने जिंकली.

# तणावमुक्त जीवनासाठी कला, कौशल्य आवश्यक : डॉ. विलास नांदवडेकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** आनंददायी आणि तणावमुक्त जीवन जगण्यासाठी आवडीनुसार कला, कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. कार्यालयीन कामकाजामध्ये संघभावना आणि सकारात्मक विचारांमुळे आदर्श कार्यप्रणाली निर्माण केल्यास कामांचा निपटारा जलदगतीने करणे शक्य आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांकरिता 'प्रशासकीय कौशल्ये' वृद्धिंगत करण्याच्या दृष्टिकोनातून 'निवासी प्रशिक्षण शिबिर' पाचगणी येथील



बहाई ॲकॅडमी येथे आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी प्रशासकीय सेवकांना मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. नांदवडेकर बोलत होते.

डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, प्रशासकीय सेवक नेहमी जागरूक राहिला पाहिजे. आपल्या विभागांमधील विषयांच्या बारकाव्यांची माहिती असणे गरजेचे आहे. उपलब्ध मनुष्यबळामध्ये योग्य पद्धतीने उत्कृष्ट कामे करण्यासाठी जोमाने कार्य केले पाहिजे. अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा उपयोग आपल्या दैनंदिन कामांमध्ये नियमित व काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे. संस्थेच्या कामावर श्रद्धा आणि प्रेम केल्यास निश्चित त्यामध्ये यश प्राप्त होते. संगणक प्रणालीचा वापर करून कामामध्ये गती वाढवण्याबरोबरच कमी वेळेत अचूक पद्धतीने पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. वेळेचे बंधन पाळणे आवश्यक आहे. सहकाऱ्यांचे कौशल्य ओळखून वेळोवेळी कामामध्ये त्यांचा उत्साह वाढवला पाहिजे.

उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, संस्थेमध्ये काम करत असताना संस्थेबद्दल आदर असणे गरजेचे आहे. अधिकाऱ्यांचा प्रशासकीय सेवकांसमवेत मुक्त संवाद होणे आवश्यक निकडीचा आहे. प्रशासनाची घडी बिघडू नये, विद्यापीठाच्या प्रतिमेस गालबोट लागू नये म्हणून सर्वांनी जाणीवपूर्वक काळजी घेतली पाहिजे. आयुष्यामध्ये जितके चांगले करता येईल तितके करावयाचा प्रयत्न केल्यास निश्चित ताणतणाव आपोआप कमी होतो.

यावेळी बहाई ॲकॅडमीचे संचालक डॉ. लेझन आझादी यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणामध्ये विद्यापीठातील पन्नास प्रशासकीय सेवकांचा समावेश होता. यावेळी कौशल्ये विकास अधिकारी महेश चव्हाण यांच्यासह तज्ज्ञ व्यक्ती डॉ. रॉड उपस्थित होते.

# प्रतिसरकार संकल्पना समजून घ्या

कोल्हापूर टाइम्स टीम

क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड व नागनाथअण्णा नायकवडी यांनी प्रतिसरकार स्थापन करून जनतेला न्याय दिला. महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्याचा प्रयत्न प्रतिसरकारच्या माध्यमातून केला. त्यामुळे प्रतिसरकार संकल्पना तरुणांनी समजून घेऊन, त्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन वाळवा येथील क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. मल्लिकार्जुन माळगी यांनी केले. शिवाजी विद्यापीठ इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित 'क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड' व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.



इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित 'क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड' व्याख्यानमालेत बोलताना प्रा. मल्लिकार्जुन माळगी

**प्रा. मल्लिकार्जुन माळगी; विद्यापीठात लाड व्याख्यानमाला**

प्रा. माळगी म्हणाले, 'जी. डी. बापू लाड व नागनाथ आण्णा नायकवडी हे दोन नेते १९४२ च्या चळवळीतील प्रमुख होते. त्यांच्या शब्दाखातर त्यांनी तयार केलेल्या तुफान सेनेत हजारो सैनिक सामील होऊन देशाशाठी लढले. त्यांच्या प्रतिसरकारने जनतेच्या हितासाठी चांगले निर्णय घेतले. कर्ज काढून लग्न करण्यापेक्षा साध्या पध्दतीने लग्न करण्याचा संदेश जी. डी. बापू ला यांनी कृतीतून दिला. पण सध्या लग्नावर लाखो रुपये खर्च होत आहे. हा खर्च कमी करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा.'

डॉ. भारती पाटील म्हणाल्या, 'तरुण पिढीला क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या कार्यांची ओळख झाली पाहिजे. त्यांच्या विचारातून राष्ट्राच्या बळकटीसाठी बळ मिळेल. तसेच महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करता येईल.'

इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अवनीश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. स्नेहल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. यावेळी कुंडल येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अरूण लाड, वसंतराव लाड, प्राचार्य डॉ. प्रताप लाड, किरण लाड, संपतराव पवार, कुंडलिक एडके, डॉ. रत्नाकर पंडित, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, सुरेश शिपुरकर आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात मोडीलिपी प्रशिक्षण कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, इतिहास अधिविभाग यांच्या वतीने दि. ३० डिसेंबर ते ५ जानेवारी या कालावधीत मोडीलिपी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. प्रशिक्षण कार्यशाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचे मोडी पंडित मच्छिंद्र चौधरी व समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेसाठी प्रवेश विनामूल्य आहे.